प्रेसनोट दि. १४/१०/२०२४

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४८ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सतीश अरुण जाधव, वय ४२ वर्ष, पद- पोलीस हवालदार, नेमणुक – तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | सुरवातीस १२,०००/- |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ११/१०/२०२४, दि. १३/१०/२०२४ व दि. १४/१०/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १४/१०/२०२४ |
| ठिकाण | कृपा बिअर शॉपीसमोर, मंत्रा सिटी रोड, तळेगाव दाभाडे, ता. वडगावमावळ, जि. पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे बिअर शॉपी चालवित असून, त्यांच्या दोन बिअर शॉपी आहेत. लोकसेवक सतीश जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे सदर बिअर शॉपी व्यवस्थित चालु ठेवण्यासाठी, कोणताही त्रास न होण्यासाठी व खोटे गुन्हे दाखल न करण्यासाठी प्रत्येक बिअर शॉपी चे ६,०००/- प्रमाणे दोन बिअर शॉपीचे एकुण १२,०००/- रुपयाची लाचेची मागणी स्वतःसाठी व पोलीस निरीक्षक यांचेसाठी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक सतीश जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे वरील कामासाठी तडजोडीअंती ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, ५,०००/- (पाच हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता लोकसेवक सतीश जाधव याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रेम वाघमोरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

14/10/24

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner